# सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

CAM
Cycling Association Of Maharashtra

संलग्न : सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलम्पिक असोसिएशन

नोंदणी : सोसायटीज् रजिस्ट्रेशन अ‍ॅक्ट १९६० आणि बॉम्बे पी.टी.ए.१९५० नं. ६९४/१६ आणि एफ/२४६८९

| **अ‍ॅड. विक्रम रोठे** | **प्रताप जाधव** | **प्रा. संजय साठे** | **भिकन अंबे** |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | संघटन सचिव | सचिव | खजिनदार |

## अत्यंय महत्वाचे व तातडीचे परिपत्रक

**दिनांक:** ३१ जुलै २०२३

प्रती,

**मा. अध्यक्ष / मा. सचिव**

सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला

संलग्न सर्व जिल्हा संघटना / क्लब / सायकलपट्टू व संबंधीत सर्व

स.न.वि.वि.

**विषय: २०व्या राष्ट्रीय एमटीबी सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी सहभागी होणारा महाराष्ट्र संघ निवड करण्यासाठीच्या निवड चाचणी स्पर्धेबाबत....**

महोदय / महोदया,

१) सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रला संलग्न असलेल्या सभासद सर्व सायकलिंग जिल्हा संघटनांचे नोंदणीकृत सायकलपट्टू व संबंधीतांसाठी.......

२) सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडियातर्फे सन २०२३-२४ सालची २०वी राष्ट्रीय एमटीबी सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा मोरणी हिल्स्, पंचकूला, हरयाणा येथे ८ - १० सप्टेंबर २०२३ मध्ये होणार आहे. **केरळ येथे होणा-या आगमी आशीयाई एमटीबी सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेसाठी भारतीय संघाची निवड या स्पर्धेमधून होणार आहे.**

३) या २०व्या राष्ट्रीय एमटीबी सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होणारा महाराष्ट्र संघ निवड करण्यासाठी रविवार दिनांक १३ ऑगस्ट २०२३ रोजी (टाईम ट्रायल - Time Trial) प्रकारात महाराष्ट्र राज्य स्तर खुल्या निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन आळंदी, जिल्हा पुणे येथे करण्यात आले आहे. **(याबाबतचे परिपत्रक दिनांक २४ जुलै २०२३ रोजी आपणांस पाठविण्यात आले आहे.)**

४) **आळंदी येथे दिनांक १२ ऑगष्ट २०२३ रोजी संध्याकाळी ६:०० ते ७:०० दरम्यान पूज्य बन्सीलाल कारवा धर्मशाळा, आळंदी - चाकण रोड, आळंदी ४१२ १०५ येथे रायडिंग क्रमांक (BIB) वाटप होईल.**

५) **रविवार, दिनांक १३ ऑगष्ट २०२३ रोजी सकाळी ७:३० वाजता स्पर्धे ठिकाणी रीपोर्टींग व सकाळी ८:०० पासून सर्व वयोगटातील टाईम ट्रायल स्पर्धा होतील. (सविस्तर वेळापत्रक सोबत जोडले आहे.)** या राज्यस्तर एमटीबी सायकलिंग निवड चाचणी स्पर्धेसाठीचे वयोगट (जन्मतारखेसह), ईव्हेंटलीस्ट सोबत जोडलेले आहे.

६) **रविवार, दिनांक १३ ऑगष्ट २०२३ रोजी स्पर्धे ठिकाणी सकाळी ९:३० वाजता एक बैठक (वुमेन ज्युनिअर ट्रायल झाल्यानंतर) घेण्यात येईल. या बैठकीस सर्व सायकलपट्टू, पंच, व्यवस्थापक, प्रशिक्षक, पालक यांनी हजर राहवे. यावेळी सर्व माहिती देण्यात येईल.**



CYCLING for Health...Strength.... & Pollution free INDIA.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

KREEDA JAGRUTI

७) सायकलपटूंनी निवास व भोजन व्यवस्था स्वत:ची स्वत: करावयाची आहे.

८) ज्या सायकलपटूंस कारवा धर्मशाळेत निवास व्यवस्था हवी आहे त्यांनी श्री. बिरु भोजने मोबाईल क्र. 98346 75954 यांचेशी संपर्क साधावा.

**९) जिल्हा संघटनांनी आपल्या सायकलपटूंची नोंदणी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे करुन घेणे बंधनकारक आहे. ज्या सायकलपटूंची नोंदणी आहे आणि ज्यांच्याकडे रीन (RIN) आहे अशाच सायकलपटूंना या राज्य निवड चाचणी स्पर्धेत सहभागी होता येईल.**

१०) **RIN** नंबर मिळवण्यासाठी **कॅम CAM च्या वेबसाईट वरुन लिंक द्वारे माहिती भरता येईल किंवा या सोबत लिंक दिलेली आहे. आपण योग्य ती सर्व माहिती दिल्यानंतर पुढील २४ तासात आपणांस RIN नंबर मिळेल त्यानंतर सायकलपटूस स्पर्धा व पुढील सर्व माहिती ईमेलद्वारे देण्यात येईल.**

११) सायकलपटूने सीएफआय चे रायडिंग लायसेन्स काढून घेणे बंधनकारक नाही. मात्र भविष्यात ज्या सायकलपटूंची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी होईल त्यांना सीएफआय लायसेन्स तयार करुन घेणे बंधनकारक राहील.

१२) **RIN नंबर मिळाल्यानंतर प्रत्येक सायकलपटूने नोंदणी फॉर्म व इतर सर्व फॉर्म भरुन आळंदीला घेऊन यायचे आहेत. जे आळंदीला स्पर्धेसाठी येणार नसतील त्यांनी ते पुढील पत्त्यावर पाठवावेत. प्रताप जाधव, संघटन सचिव, डी-१८, अनिकेत हौसिंग सोसायटी क्र १, बिबवेवाडी रोड, पुणे ४११ ०३७.**

१३) **आळंदी येथे होणा-या स्पर्धेसाठी प्रवेशिका प्रत्येकाला पाठविण्यात येणा-या लिंकद्वारे भरावयाची आहे. इतर कोणत्याही माध्यमाद्वारे आळंदी येथील स्पर्धेच्या प्रवेशीका स्वीकारण्यात येणार नाहीत.**

**१४) आळंदी येथील स्पर्धेच्या प्रवेशिका बुधवार दिनांक ९ ऑगष्ट २०२३ पर्यंत स्वीकारण्यात येतील.**

१५) **उशीरा आलेल्या प्रवेशिका नाकारण्याचा किंवा लेट फी सह स्वीकारण्याचा अधिकार** सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचा राहील.

सायकलपटूंच्या प्रवेशिका उशिरा मिळाल्यामुळे स्पर्धा आयोजनामध्ये खूप अडचणी येतात. त्यासाठी प्रवेशिका वेळेत पाठविण्याची जबाबदारी संबंधीत सायकलपटूची राहील. उशिरा आलेल्या प्रवेशिकेस सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, जिल्हा सायकलिंग असोसिएशन किंवा आयोजक वा पुरस्कर्ते जबाबदार असणार नाहीत.



ॲड. विक्रम रोठे — अध्यक्ष | प्रताप जाधव — संघटन सचिव | प्रा. संजय साठे — सचिव | भिकन अंबे — खजिनदार



**१६) स्पर्धेमध्ये प्रत्येक खेळाडूने आपल्या जिल्ह्याचा टी-शर्ट वापरणे आवश्यक आहे.**

**१७) स्पर्धेमध्ये प्रत्येक खेळाडूने योग्य हेल्मेट घालणे बंधनकारक आहे, हेल्मेट न घातल्यास अशा खेळाडूचा स्पर्धेतील सभाग रद्द करण्यात येईल किंवा योग्य हेल्मेट नसल्यास स्पर्धेत सहभागी होता येणार नाही.**

१८) खर्च व नोंदणी आकार प्रत्येक सायकलपट्टूस रुपये ५००/- असा असेल.

**१९) सायकलपट्टूस केवळ एका वयोगटात भाग घेता येईल. एकापेक्षा जास्त वयोगटात भाग घेता येणार नाही.**

२०) जिल्हा संघटनांकडून किंवा वैयक्तीकरीत्या आयत्या वेळी (स्टार्टिंग लाईनवर / स्पर्धे ठिकाणी) नांव नोंदणी कोणत्याही परिस्थीतीमध्ये होणार नाही.

**२१) भारतीय सायकलिंग महासंघाशी (सीएफआय) संलग्न असलेल्या सेनादल, रेल्वे क्रीडा मंडळ आदी संस्थांमधील खेळाडूंना तसेच महाराष्ट्र सोडून इतर राज्यातील सायकपट्टूंना या स्पर्धेत सहभागी होता येणार नाही. महाराष्ट्राचा अधिवास असलेल्या सायकलपट्टूंनाच या स्पर्धेत सहभागी होता येईल.**

**२२) ज्या जिल्ह्याचा रहिवाशी असेल किंवा ज्या जिल्ह्यात शिक्षण वा नोकरी करत असेल त्या जिल्ह्याकडूनच सहभागी होता येईल. एका वर्षात एकाच जिल्ह्यामधून होता येईल**

**२३) पंचांच्या निर्णयाविरूद्ध हरकत घ्यावयाची असेल तर ती निकाल जाहीर केल्यानंतर पुढील ३० मिनीटांमध्ये लेखी स्वरुपात घ्यावी लागेल. त्यासाठी सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे आगाऊ १,०००/- रूपये भरून पावती घ्यावी. ३० मिनीटांनंतर आलेल्या हरकतीचा विचार करण्यात येणार नाही वा दखल घेतली जाणार नाही. अशा हरकतीबाबत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचा / अपील कमीटीचा निर्णय अंतिम असेल. कोणत्याही परिस्थितीत हरकत फी परत केली जाणार नाही.**

**२४) वयाच्या पुराव्यासाठी नोंदणी अर्ज व्यवस्थीत वाचून त्याची पूर्तता करावी.**

**२५) सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रकडे नांव नोंदणी नसलेल्या सायकपट्टूंना या स्पर्धेत किंवा सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने आयोजित केलेल्या किंवा सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रने मान्यता दिलेल्या कोणत्याही सायकल स्पर्धेमध्ये सहभागी होता येणार नाही.**





पत्रव्यवहाराचा पत्ता
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

२६) **<u>लिंकद्वारे *अर्ज व्यवस्थीत भरुन त्याप्रमाणे प्रवेश* खर्चाची सर्व रक्कम सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या बँक खात्यामध्ये भरावी.</u>**

२७) <u>स्टार्टींग ऑर्डर व दिलेल्या वेळेप्रमाणे आपापल्या वेळेस सायकलपट्टूंनी हजर रहावे.</u> भारतीय सायकलिंग महासंघ (सी.एफ.आय.) च्या नियमानुसार संबंधीतांवर रोख दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

२८) स्पर्धा भारतीय सायकलिंग महासंघ (सी.एफ.आय.) आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (कॅम) यांनी केलेल्या नियमांनुसार तसेच या नियमांत वेळोवेळी केलेल्या बदलानुसार होईल.

२९) ज्या जिल्ह्याच्या खेळाडूंना स्पर्धा मार्गावर सराव करावयाचा आहे त्यांनी स्वखर्चाने व स्वत:चे जबाबदारीवर करावयाचा आहे.

**३०) एकच सायकल दोघांमध्ये वापरावयाची असेल तर त्यासाठी रुपये १००/- खर्चापोटी अगोदर जमा करुन त्याप्रमाणे लेखी परवानगी घ्यावी लागेल. आयत्यावेळी एकच सायकल दोघात वापरण्यास परवानगी देण्यात येणार नाही.**

**३१) स्पर्धेदरम्यान हेल्मेट डोक्यामधून काढल्यास किंवा त्याचे बक्कल काढल्यास किंवा ते ढीले बांधलेले आढळल्यास संबंधीताचा त्याक्षणी स्पर्धेमधील सहभाग रद्द करण्यात येईल.**

**३२) स्पर्धेदरम्यान स्पर्धकाने कोणत्याही कारणाने हॅण्डेलवरील दोन्ही हाथ सोडल्याचे निर्दर्शनास आल्यास त्याक्षणी त्या स्पर्धकाचा स्पर्धेमधील प्रवेश रद्द करण्यात येईल.**

३३) सर्व सायकलपट्टूंनी नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. बेशिस्त खेळाडू तसेच उद्धट खेळाडूविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रशिक्षक, व्यवस्थापक वा पालक यांच्यामुळे स्पर्धेत अडथळा आल्यास संबंधीतांच्या स्पर्धकावर स्पर्धेमधून निलंबनाची कारावाई करण्यात येईल.

**३४) स्पर्धेदरम्यान सायकलपट्टूंना मोबाईल फोन अथवा कानामधील ऐकण्याचे मशिन (ईअरींग) वापरता येणार नाहीत. असे करताना खेळाडू आढळल्यास या स्पर्धेमधील संबंधीत सायकपट्टूचा सहभाग त्याक्षणी रद्द करण्यात येईल.**

३५) कोणत्याही कारणाने स्पर्धे ठिकाणी वा स्पर्धेदरम्यान स्पर्धकाने वा त्याच्याशी संबंधीत इतरांनी पंच, पायलेट, तांत्रिक अधिकारी यांच्याशी परस्पर संपर्क साधायचा नाही वा चर्चा करायची नाही वा मोबाईल करावयाचा नाही. तसे आढळल्यास संबंधीत स्पर्धकास त्या स्पर्धेमधून निलंबीत करण्यात येईल. कोणासही काहीही शंका असल्यास श्री प्रताप जाधव किंवा प्रा. संजय साठे यांच्याकडेच संपर्क साधावयाचा आहे.




**पत्रव्यवहाराचा पत्ता**

डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**

इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**

**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com

**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

३६) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी कोणत्याही कारणाने स्पर्धक उशीरा हजर झाला तर त्यास रु. २०० दंड आकारण्यात येईल.

३७) स्टार्टिंग ऑर्डर प्रमाणे स्पर्धक हजर न राहील्यास किंवा स्टार्टिंग ऑर्डर मधील स्पर्धाकाचा क्रम चूकल्यास जास्तीत जास्त दोन मिनीटांपर्यंत संबंधीत स्पर्धकास रुपये ५०० स्पर्धा खर्च आकारुन सोयीनुसोर स्टार्ट देण्यात येईल.

३८) स्टार्टिंग ऑर्डर प्रमाणे स्पर्धक हजर न राहील्यास किंवा स्टार्टिंग ऑर्डर मधील स्पर्धाकाचा क्रम चूकल्यास अशा स्पर्धकास स्पर्धेत सहभाग घ्यायचा असल्यास रु. १,००० स्पर्धा खर्च आकारुन स्टार्ट देण्यात येईल. स्टार्ट केव्हा द्यायचा याचा निर्णय स्पर्धे ठिकाणचे पंच व अधिकारी ठरवतील.

**३९) फिडींग झोन शिवाय फिडींग वा पाणी देणे असे प्रकार करु नयेत, असे कोणी आढळल्यास संबंधीतांच्या स्पर्धकावर कारवाई करण्ययात येईल.**

४०) स्पर्धा सुरु होण्याच्या ठिकाणी किंवा स्पर्धा सुरु असताना कोणीही प्रशिक्षक, व्यवस्थापक, पालक किंवा स्पर्धकाशी संबंधीत इतर कोणीही स्पर्धेस अडथळा होईल, सायकलपट्टूस व्यत्त्यय होईल असे कोणतेही कृत्य करु नये तसे करताना आढळल्यास त्या व्यक्तीशी संबंधीत सायकलपट्टूवर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

४१) स्पर्धेमध्ये पाणी वा फिडींग नियमानुसार दिले जाईल. केवळ त्या स्पर्धकाचे प्रशिक्षकच फिडींग वा पाणी देऊ शकतात. **ठरवून दिलेल्या फिडींग झोन मध्येच पाणी वा फिडींग देता येईल.**

४२) फिडींग झोन व्यतिरीक्त इतर ठिकाणी स्पर्धक स्वत: जवळील फिडींग वा पाणी वापरु शकतो. फिडींग झोन शिवाय इतर ठिकाणी स्पर्धक पाणी वा फिडींग घेताना आढळल्यास अशा स्पर्धकास अशा प्रत्येक प्रसंगी रुपये २०० स्पर्धा दंड आकारण्यात येईल व अशा तीन प्रसंगानंतर त्या स्पर्धकास १ मिनीटांची पेनेल्टी होईल. **(अशा स्पर्धकाने दिलेल्या एकूण वेळेमध्ये एक मिनीटांची वेळ वाढवण्यात येईल.)**

४३) फिडींग झोनमध्ये फिडींग वा पाणी घेताना इशारा करुन अगोदर एका बाजूस यावे व आपल्या प्रशिक्षकास इशारा व आवाज द्यावा आणि फिडींग वा पाणी घ्यावे. मास स्टार्ट स्पर्धेदरम्यान बंचच्या पुढे किंवा अचानक एका बाजूला जाऊन फिडींग वा पाणी घेण्याचा प्रयत्न करु नये. बंचच्या शेवटी येऊन फिडींग वा पाणी घ्यावे. कोणत्याही परिस्थीतीमध्ये इतर सायकलपट्टूंना धोका होईल असे वर्तन करु नये, तसे आढळल्यास दंडात्मक वा स्पर्धेमधून निलंबन अशी कारवाई करण्यात येईल.





**पत्रव्यवहाराचा पत्ता**

डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**

इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**

**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com

**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com

४४) आयत्यावेळी उदभवलेल्या कोणत्याही कारणाने स्पर्धा कार्यक्रमात बदल करण्याचे अधिकार सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र वा संयोजकांस आहेत. हे सर्व बदल सहभागी सर्वांवर बंधनकारक असतील.

४५) सर्व जिल्हा संघटना व सायकलपटूंनी वरील बाबींची नोंद घ्यावी व नेहमीप्रमाणे सहकार्य करावे ही विनंती. कळावे, धन्यवाद.

आपले स्नेहांकित

प्रताप जाधव
स्पर्धा संचालक व संघटन सचिव

प्रा. संजय साठे
सचिव,

प्रत माहितीसाठी :-

१. मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. मा. प्राचार्य, क्रीडा प्रबोधिनी, पुणे

## या निवड चाचणी स्पर्धेसाठी वयोगट आणि वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील

The age group and schedule for this selection trials is as follows

| Sl No. | Events | Qualify Birth Year for the year 2023 | Event | Laps | Trial Start Time |
|---|---|---|---|---|---|
| | **REPORTING, BIB DISTRIBUTION AND POOJA** | | | | **7:30 AM** |
| 1 | Youth Girls | 2009, 2010 & 2011 | XCT Cross Country (Time Trial) | 1 | 8:00 AM |
| 2 | Youth Boys | 2009, 2010 & 2011 | XCT Cross Country (Time Trial) | 2 | 8:00 AM |
| 3 | Sub Junior Girls | 2007 & 2008 | XCT Cross Country (Time Trial) | 2 | 8:00 AM |
| 4 | Sub Junior Boys | 2007 & 2008 | XCT Cross Country (Time Trial) | 3 | 8:45 AM |
| 5 | Women Junior | 2005 & 2006 | XCT Cross Country (Time Trial) | 3 | 8:45 AM |
| | **BREAK FOR MEETING** | | | | **9:30 AM** |
| 6 | Men Junior | 2005 & 2006 | XCT Cross Country (Time Trial) | 4 | 10:00 AM |
| 7 | Elite Women | Before 2004 | XCT Cross Country (Time Trial) | 4 | 10:00 AM |
| 8 | Elite Men | Before 2004 | XCT Cross Country (Time Trial) | 6 | 10:30 AM |

**Pratap Jadhav**
Org. Secretary

**Prof. Sanjay Sathe**
Secretary




पत्रव्यवहाराचा पत्ता
डी१८, मातृछाया, अनिकेत सोसायटी नं. १, बिबवेवाडी रोड, **पुणे ४११०३७.**
इशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगाव, **अहमदनगर ४१४००१**
**संपर्क :** 942 233 6808 **ई-मेल :** cyclingassociationmaharashtra@gmail.com
**बेवसाईट :** www.cyclingassociationofmaharashtra.com